# मातृदिनाच्या शुभेच्छा

# **सर्वश्रेष्ठ स्वयंसेविका**

~ गुरुमाई चिद्विलासानंद

दरवर्षी नोबेल पारितोषिक कोण जिंकते?
किंवा कदाचित असे विचारणे अधिक योग्य ठरेल की
नोबेल पारितोषिक कोणी जिंकायला *हवे*
पण जिंकणार मात्र नाही?
तर मग, खरे उत्तर आहे . . . *एका आईने.*
ती एक आई आहे यासाठी
नोबेल पारितोषिक जिंकण्यास तिला कधीच विचारात घेतले जाणार नाही,
यद्यपि ही गोष्ट नाकारणे कठीण आहे की रात्रंदिवस,
एक आई या पारितोषिकासाठी आवश्यक असलेल्या त्या सर्व गोष्टींची पूर्तता करत असते
ज्या गोष्टी या पारितोषिकाच्या संस्थापकाने ठरवल्या होत्या.
नोबेल पारितोषिक त्यांना दिले जाते
*"ज्यांनी समस्त मानवजातीच्या*
*महानतम लाभासाठी आपले योगदान दिले आहे."*

एका आईने काय-काय केले आहे, याविषयी कोणतीही शंका कशी घेतली जाऊ शकते?
एक आई काय *करू शकते,* याविषयी कोणतीही शंका कशी घेतली जाऊ शकते?
एका आईच्या विलक्षण क्षमतेविषयी
कोणतीही शंका कशी घेतली जाऊ शकते?
खरे सांगायचे झाले तर, असे काय आहे की, जे एक आई *करू शकत नाही?*

प्रौढावस्थेमध्ये जवळजवळ प्रत्येकालाच या गोष्टीमुळे काहीसे ओशाळल्यागत वाटते
की त्याच्या बालपणी आणि तारुण्यात
तो त्याच्याविषयी असलेल्या त्याच्या आईच्या अपार प्रेमाचे
मूल्य जाणू शकला नाही.
म्हणून, मला असे वाटते की, एकदा का ही समज आपल्याला प्राप्त झाली
आणि आपण एका आईच्या स्नेहार्द्र व काळजी घेणाऱ्या विशाल ह्रदयाची
तसेच “माझ्या-मुलांसाठी-मी-काहीही-करेन” अशा तिच्या वृत्तीची प्रशंसा करू लागलो,
की आपले हे नैतिक दायित्व बनते की, आपण तिच्या त्यागावर
आणि मुलांबद्दल असलेल्या तिच्या अखंड प्रेमावर प्रकाश टाकावा.
आपण लाभार्थी आहोत या अद्भुत उपहाराचे—
एका आईच्या निर्मळ आणि सदाबहार प्रेमाचे.

एका आईचे प्रेम . . .

आईच्या प्रेमाचा सुगंध कसा असतो?
आईच्या प्रेमाचा रंग कसा असतो?
आईच्या प्रेमाचा आवाज कसा असतो?
आईच्या प्रेमाचा स्वाद कसा असतो?
आईच्या प्रेमाचा स्पर्श कसा असतो?

या जगात प्रत्येक जण प्रेम शोधत असतो
आणि प्रेमाचे अनेकानेक प्रकार आहेत,
त्यांपैकी काही असे आहेत जे साध्य करता येतात
आणि कदाचित काही असे आहेत की जे असाध्य आहेत.
पण जे प्रेम आरंभापासून अस्तित्वात आहे
ते कोणाच्याही हाती लागत नाही.
भगवंताचे प्रेम प्रत्येक ह्रदयात प्रतिष्ठापित आहे,
तथापि, साधकाच्या आध्यात्मिक साधनेद्वारेच

ते प्रेम स्पष्टपणे अनुभवता येते.
दुसऱ्या बाजूला, एका आईचे प्रेम दृश्यमान असू शकते,
परंतु बहुधा ते आकलनाच्या पलीकडेच राहते.
प्रेमाचे जितके म्हणून प्रकार आहेत,
त्यांपैकी हेच दोन असे आहेत की, जे प्रत्येक पावलागणिक
अहेतुक असतात,
अत्यंत क्षमाशील असतात.

तुम्ही पाहिले नाही का की, एखादी स्त्री तिच्या अस्तित्वात जेव्हा एका बाळाला वाढवत असते,
तेव्हा तिचा चेहरा कसा तेजाने झळकत असतो?
एक अलौकिक प्रकाशमंडल तिला चहूबाजूंनी वेढून असते
आणि जो उल्हास तिच्यातून प्रस्फुटित होत असतो
तो त्या सर्वांच्या हृदयामध्ये एक असामान्य सौंदर्य जागृत करतो
ज्यांना तिची चमचमणारी दीप्ती स्पर्श करते.

याविषयी काहीही सांगता येणार नाही की एका होणाऱ्या आईला
कितीसे माहीत असते की, तिच्या मुलांचे संरक्षण करण्यासाठी
तिला कोणकोणत्या अडचणींना तोंड द्यावे लागेल.
काही अंशी, तिला याविषयी कदाचित ठाऊकच नसेल
की मातृत्वाचे कर्तव्य पार पाडणे याचा अर्थ काय आहे.
पण ती निर्भीड राहते.
मातृत्वाशी निगडित असलेल्या जबाबदाऱ्या
तिला जसजशा हळूहळू कळू लागतात,
तेव्हादेखील त्या पार पाडण्यापासून ती मागे हटत नाही.
ही दृढता, उद्देशाचा हा ठामपणा,
हे तिच्यामध्ये येतात तरी कुठून?

मातृदिनाच्या उत्सवाप्रीत्यर्थ,
आपण या मातांना हार्दिक धन्यवाद देऊ या,
ज्या या जगातील महानतम स्वयंसेविका आहेत,
ज्या प्रत्येक पीढीला शिक्षित करण्यासाठी,
आपल्या अंतरातून विस्मयकारक शक्तीचे आणि गहन प्रज्ञानाचे
आवाहन करतात.

प्रत्येक आईमध्ये असे अनुपम गुण असतात,
ज्यांमुळे हे जग जागृत होते आणि स्वतःच्या दिनचर्येत निमग्न होते.
मी तुम्हा सर्व मातांप्रति माझी कृतज्ञता अर्पण करू इच्छिते
त्या गुणांचा उत्सव साजरा करून
जे मी तुमच्यामध्ये पाहिले आहेत.
तुमच्या सद्‌गुणांच्या यादीला तर मर्यादाच नाही,
तरीदेखील आत्तापुरते, मी त्यांपैकी फक्त काहीच उल्लेखनीय गुणांवर
केंद्रण करू इच्छिते.

हे मातांनो, तुम्हाला धन्यवाद
तुमच्या महानतेसाठी आणि तुमच्या महिम्यासाठी,
तुमच्या अविचल धैर्यासाठी आणि दिलासा देणाऱ्या तुमच्या हास्यासाठी,
समाजाच्या मागण्यांपुढे मान झुकवण्याविषयी असलेल्या तुमच्या अनिच्छेसाठी
आणि तुमच्या अत्युत्तम आत्मशक्तीसाठी.
तुम्हाला धन्यवाद,
तुमच्या लेकराला तुम्ही करत असलेल्या मार्गदर्शनातील सातत्यपूर्णतेसाठी
आणि ज्या पद्धतीने तुम्ही सांत्वन करता त्यासाठी,
तुमच्या मुलांचे जीवन उन्नत व्हावे याकरिता तुम्ही करत असलेल्या दृढ प्रयत्नांसाठी,
आणि तुमच्या मुलांविषयी गर्व बाळगण्यासाठी,
तुमच्या या अविनाशी इच्छेसाठी की
तुमची मुले आणि त्यांची मुले सुरक्षित राहावीत, सुखी राहावीत

आणि त्यांनी त्यांच्या मातृभूमीच्या उन्नतीकरिता
योगदान करावे.

तुम्हाला धन्यवाद,
तुमच्या मुलांनी कोण असायला हवे आणि त्यांना काय बनायचे आहे,
याविषयीच्या त्यांच्या इच्छेचे समर्थन करण्यासाठी,
आणि त्यांच्या जीवनातील चढउतारांमध्ये
उदारतेने त्यांना आधार देण्यासाठी.
तुमची मुले तुमचा आदर करोत अथवा न करोत,
ते तुमच्या बाजूने उभे राहोत अथवा न राहोत,
तुम्ही एकमेकांसोबत असा अथवा नसा,
तुमचे हृदय सदैव त्यांच्यावर आशीर्वादांचा वर्षाव करत असते.
तुम्ही केवळ एकच गोष्ट जाणता,
आणि ती म्हणजे तुमच्या मुलांवर सदासर्वदा सर्वस्वी प्रेम करत राहणे.

हे तुमचे कृपाळू हृदयच आहे,
शालीनतेने आणि परोपकारी भावनेने ओथंबलेले,
जे एक प्रकाशदीप आहे—
केवळ तुमच्या स्वतःच्याच मुलांसाठी नव्हे,
ज्यांना तुम्ही जन्म दिला आहे किंवा ज्यांना तुम्ही दत्तक घेतले आहे,
तर त्या सर्वांसाठीसुद्धा, की जे हे ओळखू शकतात की
जेव्हा ते तुमच्या सान्निध्यात असतात, तेव्हा त्यांना काय जाणवते.
खरी गोष्ट अशी आहे की,
तुम्ही कोण आहात,
तुम्ही काय करता,
आणि समाजात तुमचे स्थान किती अमूल्य आहे
हे लक्षात ठेवले असता अखिल मानवजात लाभान्वित होते,
तिचे उत्थान होते.

हे मातांनो, तुमचा सन्मान करणे,
म्हणजे जीवनाच्या उद्‌गमाला मान्यता देणे आहे
आणि या गोष्टीला मान्यता देणे आहे की,
हे जीवन युगानुयुगे कशा प्रकारे पोषित होत आले आहे.
या संपूर्ण जगाचा तुमच्याविषयी असलेला प्रशंसाभाव
तुमची मुले जेव्हा पाहतात,
तेव्हा ती या ज्ञानासह मोठी होतात की,
त्यांनी कोणाप्रति उच्च सन्मानाची भावना धारण केली पाहिजे.

काळजी घ्या, हे मातांनो,
आज आणि सदैव स्वतःची काळजी घ्या.
ती कशी घ्यायची हे तुम्हाला निश्चितच माहीत आहे,
तेव्हा कसलाही संकोच न बाळगता तसे करा.
मान्यता मिळण्याची आणि
आपुलकीने प्रेमळपणे जिची काळजी घेतली जावी याची
अधिकारी जर कोणी असेल—
तर त्या तुम्हीच आहात.

तुम्ही स्वर्गलोकातून अवतरलेले खरे देवदूत आहात.
तुम्ही या पृथ्वीतलात दडलेली मौल्यवान रत्ने आहात.
तुमची शान, तुमची आभा या जगाचा कणा आहे.

© २०२४ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.